


ISSN - No. 2319-9318

*Peer Reviewed International Research Journal*

# VIDYAWARTA

*Special Issue.*

Ashti Taluka Shikshan Prasarak Mandal's


## Arts,Commerce and Science College, Ashti

Tal.Ashti, Dist.Beed (MS)

Accredited by NAAC B++ Grade with 2.78 CGPA,
ISO 9001:2015, Green Audited College

**Interdisciplinary National Conference on**

## Recent Trends in Social Sciences & Commerce



27th February 2018

## HISTORY AND SOCIOLOGY

Organizer
Dr. S. R. Nimbore
Principal

| | | | |
|---|---|---|---|
| 24 | बालकामगार समस्या | प्रा.वाळके बी.बी. | 84 |
| 25 | बालकामगार समस्या आणि उपाय | डॉ. विठ्ठल भिमराव मातकर | 88 |
| 26 | भारतातील बालकामगार समस्या : कारणे व उपाय | प्रा.सिताराम के. मोगल<br>प्रा.भागवत द.गोरे | 92 |
| 27 | बालकामगार समस्या : कारणे आणि उपाय | प्रा. पेरके वैशाली शेषराव | 96 |
| 28 | *बालमजूरीचे निर्मूलन एक सामाजिक आव्हान* | *प्रा.डॉ. रेणुका द. बडवणे* | 99 |
| 29 | बालकामगार एक सामाजिक समस्या | प्रा.डॉ.आव्हाड बी.बी. | 102 |


**History**


| | | | |
|---|---|---|---|
| 30 | Role of Womens in Indian Freedom Struggle | Dr Rajaram.R.Pimpalpalle | 105 |
| 31 | A Historiographical Survey: Women's in Indian History | Dr. B.K. Shep | 107 |
| 32 | Mahatma Jotirao Phule: A Philosopher & Maker of Modern Maharashtra | Mahesh S Jadhav | 110 |
| 33 | Dr. B.R. Ambedkar's Indian Constitution Legacy as the Maker of the Modern India | Mr. D. M. Randive | 113 |
| 34 | Netaji Subhashchandr Bose : Great Freedom Fighter | Mr. Sandip Haribhau Shirsath | 115 |
| 35 | Nomadic Tribes in India: a reflection on history of Masan Jogi | Priyanka Jadhav Pradnyasurya<br>Hemchand Shende | 121 |
| 36 | Gandhi's Economic Thought | Prof. Ravi Subhashrao Satbhai | 126 |
| 37 | भारतीय क्रांतिकारी चळवळीमध्ये कल्पना दत्तचे योगदान | प्रा. डॉ विजया साखरे | 132 |
| 38 | १८५७ च्या राष्ट्रीय उठावात बेगम जिनत महल आणि हजरत महल या मुस्लिम महिलांचे योगदान | डॉ.शेख हुसैन इमाम | 135 |
| 39 | भारतीय इतिहासातील कर्तृत्ववान स्त्रिया | डॉ.शिवाजी सोमला पवार | 138 |
| 40 | आधुनिक भारताच्या निर्मितीत पंडित नेहरूंचे शैक्षणिक योगदान | प्रा. राजेसाहेब भोसले | 142 |
| 41 | छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यापारविषयक धोरण | प्रा. बोडके बालाजी रावसाहेब | 144 |
| 42 | भारतीय स्त्रियांच्या सामाजिक शैक्षणिक स्थितीचा ऐतिहासीक मागोवा | प्रा. डॉ. बिराजदार डी. एस. | 147 |
| 43 | आधुनिक भारताच्या इतिहासातील महिलांचा सहभाग | प्रा.डॉ.शिवाजी लक्ष्मण नागरगोजे | 150 |
| 44 | आधुनिक भारताच्या इतिहासात स्वातंत्र्य चळवळीतील | प्रा. मोहन काळकुट | 153 |
| 45 | स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांच्या सहभागाचा ऐतिहासिक अभ्यास | प्रा.डॉ.जी.व्ही.गट्टी ड डॉ.<br>राधाकृष्ण ल. जोशी | 155 |
| 46 | समाज सुधारक सावित्रीबाई फुले | प्रा.डॉ.सदाफुले डी.एल. | 157 |
| 47 | भारतातील स्त्रीवादी चळवळीचे स्वरुप | प्रा.घाडगे सोमनाथ व्यंकटी | 161 |

# १८५७ च्या राष्ट्रीय उठावात बेगम जिनत महल आणि हजरत महल या मुस्लिम महिलांचे योगदान

**डॉ.शेख हुसैन इमाम**
इतिहास विभाग
मिल्लीया कला, विज्ञान व व्यवस्थापन
शास्त्र महाविद्यालय, बीड

**प्रस्तावना:**

इ.स. १८५७ च्या संग्रामात भारतीय महिलांचे कर्तृत्व चमकून उठले. महिलांनी स्वातंत्र्य संग्रामास सर्वतोपरी मदत केली. संग्रामाचा निश्चित दिवस ३१ मे हा होता मात्र १० मे रोजीच मेरठ येथे याचा आरंभ झाला. मेरठच्या घटनेमागे महिलाच कारणीभूत आहेत. काडतूस प्रकरणावरून ९० भारतीय शिपायांचे कोर्ट मार्शल होऊन ८५ शिपायांना दहा वर्षाचा कारावास झाला. यांना सर्व सैनिका समोर आपमानित करण्यात आले. त्यांच्या हातापायात बेड्या ठोकल्या. हे दृष्य पाहून अन्य भारतीय शिपायांना संताप आला. ही बातमी वा-यासारखी मेरठ शहरात पसरली. भारतीय शिपायांचा मेरठ मधल्या महिला धिक्कार करू लागल्या.

बहुसंख्य भारतीयाची आता खात्री पटली आहे की, स्वार्थी इंग्रज लेखकांनी इ.स. १८५७ च्या संग्रामाची शिपायाचे बंड म्हणून अवहेलना केलेली असली तरी ती पारतंत्र्याची साखळदंड तोडून आपले स्वातंत्र्य परत मिळवण्यासाठी भारतीयांनी केलेला तो एक महान स्वातंत्र्य संग्राम होता.

**महिलांनी धिक्कार केला:**

इ.स. १८५७ च्या घटनाचा वृतांत जे. सी. विल्सन याने लिहीले की, महिलांनी हिंदू शिपायांचा जो धिक्कार केला तो पुढील प्रमाणे होय. शहरात जेथे शिपाई तेथे महिलांनी त्यांच्या धिक्कार केला. ते असे बोलले की, तुमचे बंधू तिकडे तुरूंगात पडले असता, तुम्ही बाजारात माशा मारतात. तुमचा धिक्कार असो, तुमच्या जगण्याला काहीच अर्थ नाही. महिलांचे हे बोलणे शिपायांना झोंबले. १० मे ला त्यांनी उठाव केला. इंग्रजांची घरे जाळली. तुरूंग फोडून आपल्या सैनिकाला बाहेर काढले. सदर बाजाराची लुट केली. हातात स्वातंत्र्याचा हिरवा ध्वज उभारला.

इ.स. १८५७ च्या उठावाचा प्रसार भारताच्या ब-याच प्रदेशात पसरला होता. उदाहरणार्थ कानपूर, झाशी, अवध, लखनौ, दिल्ली, बिहार या क्षेत्रात जास्त प्रभाव होता. मेरठच्या बराकपूर छावणीत वीर मंगल पांडेच्या बलिदानाने इ.स. १८५७ च्या स्वातंत्र्य युध्दाला प्रारंभ झाला होता. मेरठच्या शिपायांनी बंड केले. यानंतर अवधमध्ये ही क्रांतीचा भडका उडाला. अवधच्या क्रांतीचे नेतृत्व बेगम हजरत महल आणि मौलवी अहमदशहा करत होते.

**बेगम जिनत महल:**

बेगम जिनत महल ही तैमुर घराण्याची होती. तिचा जन्म इ.स. १८२३ मध्ये झाला. पुढे इ.स. १८४० मध्ये मोगल सम्राट बहादूरशहाजफरशी त्यांचा विवाह झाला.त्यांना इ.स. १८५७ च्या राष्ट्रीय उठावात, जिनत महलची महत्त्वपूर्ण योगदान आहे. जिनत महलने झाशीची राणी व हजरत महल प्रमाणे प्रत्यक्ष रणागणावर उतरली नसली तरी तिच्यात अभूतपूर्व साहस होते. महत्वाचे म्हणजे सम्राट बहादूरशहा जफरला अत्याचारी इंग्रजांच्या विरोधात स्वातंत्र्य संग्रामाचे नेतृत्व करण्य-याची पत्नी होती. हिच्यात उत्तम प्रशासकाचे गुण होते. तीही स्वातंत्र्यासाठी धडपडतच होती. ब्रिटीश प्रशासनाने लोक त्रस्त झाले होते. याच काळात बराकपूर छावणीत मंगल पांडेने आपल्या प्राणीची आहूती देवून क्रांतीचा शुभारंभ केला. हा वनवा लवकरच कानपुर, बनारस, अवध, मेरठ पर्यंत परसला. अशा परिस्थितीत अनेक राजे महाराजे स्वतंत्र्य बनले होते. बहादूरशहा जफर वृध्द झाले होते. ते नेहमी शेरशायरी मध्ये मग्न राहत. ते इच्छा असून ही या संग्रामात भाग घेण्यास मागेपुढे करत होते.

मेरठच्या बंडखोरांनी दिल्लीकडे कुच केले. याच प्रवासात अवध रोहीलखंडाचे सैनिकही मोगल दरबारात पोहचले. मोगल बादशहाला विनंती केली की "जहापनाह हम ब्रिटीश हुकुमत को खत्म करना चाहते है।" सैनिकांनी मोगल बादशहाला आर्शिवाद देऊन व नेतृत्व करण्याची प्रार्थना केली. सांगितले की कुठलीही चिंता करू नका आम्ही इंग्रजांचा खजिना लुटून रिताकोश भरून देवू सैनिकांच्या या प्रार्थनेकडे सम्राटाने लक्ष दिले नाही. काही विश्वास घातकी दरबारी लोकांनी सम्राटाने नेतृत्व घेऊ नये असे त्याना वाटत होते बेगम पडद्या मागून सैनीकांचा संवाद ऐकत होती. बादशहाची नकारात्मकता पाहून ती दु:खी झाली. ज्याप्रमाणे शांत स्त्रीच आपल्या पती व पुत्रांना युध्दात भाग घेण्यासाठी प्रेरित करते. त्याच प्रमाणे राणीने राजाला

प्रेरित केले. पतीला म्हटली की, राजाने आता ही वेळ शेरशायरी करण्याची नाही. नानासाहेबांचा संदेश आला आहे त्यांच्याकडून सैन्य येत आहे. सैन्याचे लक्ष दिल्लीकडे लागले आहे. आपले कर्तव्य आहे की, आपण त्यांचे नेतृत्व स्विकारून स्वागत करून त्यांना पूर्ण मदत केली पाहिजे अन्यथा इतिहास तुम्हाला कधीच क्षमा करणार नाही.

हे ऐकताच बहादुरशहा जफर उठून मोठ्याने म्हटले की, ''फिरंगीओं ने इतने जुल्म ढाए है, की हर तरफ कोहराम मचा हुआ है'' देशाचे लक्ष आता दिल्ली कडे लागले आम्ही आता जरूर लढू आता आमचे दैव मुल्कच्या दैवा बरोबर आहे म्हटले जो भी हो मंजुरे खुदा और हम कसम खाते है की, गुलामी की मौत नही मरेंगे बहादुरशहा जफरने निश्चय केला की इंग्रजांचे नामोनिशान ठेवणार नाही. त्यांनी हिंदू राजे व मुस्लिम नवाबाला आव्हान केले की, एकत्र येऊन अत्याचारी सरकारचा विरोध करावा असे सर्वांना पत्र पाठवले. आमचा एकच उद्देश आहे की फिरंगी सरकार नष्ट करणे. अनेक नवाबांवर व राजावर बादशहाच्या पत्राचा काही परीणाम झाला नाही. तरी निराश न होता जिनत बेगम ने बादशहाचे मनोबल कायम ठेवले. क्रांतीकारांचे इंग्रजांबरोबर दिल्लीत घमासान युध्द झाले. यात इंग्रजांना मागे हाटावे लागले. सरकारी खजांना लुटला अनेक बहादूर क्रांतीकारक शहीद झाले.

मात्र पुढे अंतर्गत विश्वासघात असफल नेतृत्त्व, रसदेचा अभाव यामुळे क्रांतीकारकाचे मनोबल कमी होऊ लागले. अनेक योद्धांनी रन भूमी सोडली १९ सप्टे. इ.स. १८५७ रोजी बहादूरशहा जफरला लाल किल्ल्यात नजर बंद केले. २५ सप्टेंबरला जिनत महल ही कैदी झाली. या दोघांना लाल किल्ल्यात नजरबंद ठेवले. २७ जाने इ.स. १८५८ रोजी यांच्यावर राजद्रोहाचा खटला चालवून यांना अजीवन कारावासाची शिक्षा दिली. इंग्रजांनी त्यांची रंगूनच्या तुरूंगात रवानगी केली. इंग्रजांनी बहादूरशहाच्या दोन मुलांना यापूर्वीच संपविले होते. त्यांचे कापलेले शिर रेशमी रूमालात बहादूरशहाकडे पाठवले. हे पाहून बादशहाचे मन उदीग्न झाले. ७ नोव्हेंबर इ.स. १८६२ मध्ये आजाराने बहादूरशहा जफरने जगाला निरोप घेतला. डेव्ही कॅप्टन डेन्हीसच्या मते जिनत महल सुंदर सोज्वल मध्यम उंचीची महिला होती. पडदयाच्या पाठीमागून बादशहाला सल्ला देत जिनत महलला अपराधी घोषित करतांना सरकारने त्यांच्यावर अनेक प्रकारे छळ केला. बेगमने या देशाच्या स्वातंत्र्यासाठी महलात विलासी जीवनाचा त्याग केला होता. तिचा हा त्याग कधी ही विसरता येणार नाही.यां त्यागाचे योगदान देतांना इ.स. १८८६ मध्ये यागून म्यान्मार येथे मृत्यू झाला.

**हजरत महल (बेगम अवध):**

उत्तर प्रदेश निवासी, अवधचा पदच्युत नवाब वाजिदअली शाहची राणी आणि बिंजिस कादिर या राजपुत्राची माता. इ.स. १८५७ च्या उठावात महत्वाच्या नेत्यापैकी एक. क्रांतीकारी सैन्याच्या मदतीने लखनौवर ताबा मिळवला आणि तिच्या मुलाला, बिंजिस कादिरला अवधचा राजा नेमले आणि खरी सत्ता तिच्या हातात घेऊन ती राज्यकारभार करू लागली. ब्रिटिशाविरूध्द लढण्यासाठी क्रांतीकारी फौजांना संघटीत केले. व्हिक्टोरिया राणीने आपला जाहिरनामा प्रसिध्द केल्यानंतर नोव्हेंबर इ.स. १८५८ मध्ये तिने बिंजिस कादिरच्या नावे प्रतिजाहिरनामाकाढला.नानासाहेब पेशवांच्या मदतीने क्रांतकिारी प्रयत्न अधिक प्रखर केले. लखनौचे रक्षण करतांना ब्रिटिश फौजांशी ती व्यक्तिशः लढली. शहाजहानपूरवर जो हल्ला करण्यात आला त्यामध्ये फैजाबादचे मौलवी यांना सैन्य दलाची मदत केली. नेपाळमध्ये तराई भागात आपल्या सैन्याचे पुनर्गठन केले व आपल्या सैन्यानिशी नेपाळमध्ये निसटलेल्या नानासाहेबांच्या फौजेशी तिच्या फौजेचे एकत्रीकरण केले. तिने ब्रिटिशासमोर शरणागती स्वीकारण्याचे धुडकावले. नेपाळमध्ये तिचा मृत्यू झाला असा कयास आहे.

हजरत महलने आपल्या मुलाला बिरजीस कद्र यास वाजिद अलीचे वारिस म्हणून घोषीत केले. सर्व सरदाराने त्यास नवाब मान्य केले. ११ तोफाची सलामी दिली. शहाजादाचे वय केवळ १४ वर्षाचे होते म्हणून हजरत महल राज्यकारभार करत होती. यांच्या बरोबर लखनौ वरून क्रांतीकारकाचे नेतृत्त्व करणारे अहमदुल्लाशहा, राजा वेनी माधवसिंह, राजा मानसिंग असे प्रसिद्ध व्यक्ती यांच्या बरोबर होते. मोगल बादशहाने ही शहजादयाला मान्यता दिली होती. नाना साहेब पेशव्यांनी ही आपला वकिल पाठविला त्याचप्रमानेच रोहीलखंडाचा शफिउल्लाखान, गुलाम कादीरखान, बालाराव पेशवा आणि अनेकांनी ब्रिटीशांच्या सरकारला मान्यता दिली. येथूनच इ.स. १८५७ च्या लढाईला खऱ्या अर्थाने प्रारंभ झाला. देशप्रेम हिन्दू-मुस्लिम भाईचारा तथा राष्ट्रीय एकात्मतेचे उत्तम उदाहरण होते. हे येणाऱ्या पिढीसाठी प्रेरणादायी आहे. सामान्य लोकांत एक घोषणा करण्यात आली की, 'खुल्क खुदका, मुल्क बदरशहा का हुक्कम बिरजीस का' अशा पध्दतीने शिक्का आणी मोहर ही लागू केली. शहजादाच्या नावाने एक फर्मान जाहीर करण्यात आले.

 ISSN – 2319 9318

राजाचे सर्व कारभार हजरत महल एका कमेटी मार्फत निर्णय करत होती. या कमिटीत हिन्दू-मुस्लिम दोन्ही बरोबर होते. बंडाच्या काळात त्यांचे निवासस्थान चौसकी येथे होते. याच भवन मध्ये त्यांचे दरबार भरत ती आपल्या सैनिकांना आणि सहकार्यांना उत्साह व प्रेरणा देत. सरदारांच्या मिटींगमध्ये हजरत महलने असे म्हटले होते की, "दिल्ली की महाशक्तीशाली सत्ताने अत्यंत अशावादी वादे किए थे और दिल्ली से जो पत्र पहुंचे थे वो मेरे दिलमें खुशीयों की लहर लौटाते थे. किंतु कितनी जल्द बादशहा का उपदस्या कर दिया गया. शिख और जाटो को अंग्रेजी ने खरीद लिया. और संपर्क जोडने की साधनको काट दिया नाना फडनिस को बेदखल कर दिया और लखनौ को खतरे में ढकेल दिया, ऐसे हालात में क्या होना चाहीए, हमको क्या करना चाहीए?" लखनौ में पूरी फौज मौजूद है परंतु संकल्प व उत्साहा से खाली है, यदी फौज में लढाने का संकल्प तथा देशप्रेम का जोश भरा है तो वो आलमबाग पर हमला क्यों नही करती? क्या फौज इस बात की प्रतिक्षा कर रही है कि अंग्रेजी फौज को अतिरिक्त कुमुक पहूंच जाए और वह लखनौ का घेराव कर ले। मुझे जवाब दो तुम लढने के लिए तैयार हो या नही?

हजरत महल शिपायांना त्यांच्या शौर्याबद्दल बक्षीस देत आलमबागेतील संघर्षात राजा मानसिंगला त्याच्या शौर्याबद्दल रूमाल, दुषाले आणि (फरजंदे खास) ही उपाधी देवून त्यास आपला दुत प्रशासक केला. विजयानंतर आणखीन बक्षिस देण्यात येईल असे जाहिर केले. इंग्रजांची आक्रमकता पाहून हजरत महल लखनौ शहराला तटबंदी बांधण्यासाठी ५ लाख मंजूर केले होते. हजरत महलला जेंव्हा माहीत झाले की नेपाळचा राजा जंग बहादूरला गोरखपूर आणि अवधचा काही प्रांत देऊन इंग्रज आपल्याकडे वळवून घेतात. यावरून तिच्या कल्पकते विषयी कल्पना येते. ते इंग्रजांच्या बाजूने सामील झाले होते. अमृतलाल नागर लिहीतात की बेगम हजरत महलने सुध्दा राणी लक्ष्मीबाई प्रमाणे महिलांची एक सैनिक संघटन तयार केले. महलातील दासी स्त्रिया यांचा अभ्यास करत तिने हे हिरगिरीसाठी सुध्दा स्त्री नियुक्त केल्या होत्या. तिने जवळपास पावनेदोन वर्ष अवधच्या प्रांतात क्रांतीची ज्योत प्रज्वलीत ठेवली.

ब्रिटिश फौजे बरोबर आता शक्तीशाली गोरखा फौज जंगबहादुरच्या नेतृत्त्वाखाली लखनौकडे येत होती. २५ फेब्रुवारी १८५६ रोजी हजरत महल स्वतः बिरजिसकद्र सोबत लढाईच्या मैदानात आली. यामुळे सैन्यात उत्साह वाढला मात्र याचा परिणाम काहीच झाला नाही. ११ मार्च रोजी गोरखा फौज ब्रिटिश सैन्याला मिळाली. आता दोन्ही फौजा अवधला समाप्त करण्यासाठी सरसावली. लखनौमध्ये नागरीक सुध्दा राष्ट्राच्या सुरक्षेसाठी पुढे आले होते. अशा पध्दतीने ७० ते ८० हजार लोक रणमैदानावर उतरले होते यांचे सर्व श्रेय हजरत महलला जाते. हजरत महलला पराभव स्विकारणे माहीत नव्हते. तिला जाणीव होती की, शत्रूची शक्ती आपल्या तुलनेत किती तरी मोठी आहे. ती मात्र नेहमी आपले स्थळ बदलत व नवनवीन युध्द रचना करत असल्यामुळे ती शत्रुच्या हाती लागत नव्हती. अनेक भारतीयाच्या कत्तली नंतरच शत्रूला ताबा करता आला होता. सिकंदर बागेत जखमी आणि मेलेल्या लोकांच्या ढीग एकमिटर उंची पेक्षा अधिक होता. इंग्रज सेनापती कोलीन म्हणतो की यापेक्षा जास्त बहादूरी मी पाहीली नाही.

**संदर्भ सुची**


१. नागोरी एस.एस./ कान्ता नागोरी भारत के मुस्लिम सेनानी राज पब्लिकेशन.

२. डॉ. आबीदा समीउद्दीन भारत के स्वातंत्र्य संग्राम में मुस्लीम महीलाओं का योगदान, उमेन्स कॉलेज अलीगढ युनिव्हर्सिटी अलिगढ.

३. Secret Branch 26 Feb 1858 No. 223 News of 22 Dec 1857 National archives New Delhi.

४. अमृतलाल नागर ग्रंथ गदर के फुल.

५. मौलवी जकाउल्ला तारिखे उरूजे सल्तनत इंग्लीशया हिंन्द.शेखुल हिंद ॲकेडमी देवबंद.

७. अलीगढ मॅक्झीन १९७२ उमेन्स कॉलेज अलीगढ युनिव्हर्सिटी अलिगढ.

८. रिझवी खुर्शीद मुस्तफा जंगे आजादी १८५७.

.९. हैदर अली नोमानी जंगे आजादी में मुसलमानों की कुर्बानियाँ दानिश बुक डेपो अंबेडकर नगर, उत्तर प्रदेश.